# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०४/२०२४ (सोमवार) सकाळ**

---

## मा. पंतप्रधान यांचा सभास्थळी जनतेने पाळावयाचे सर्वसाधारण नियम

मा. पंतप्रधान भारत सरकार हे सार्वत्रीक लोकसभा निवडणुक २०२४ संबंधाने GROW MORE VENTURES मैदान कन्हान नागपुर जिल्हा येथे दिनांक १०/०४/२०२४ रोजी प्रचार सभा आयोजित केली असुन सदर प्रचारसभेस येतांनी जनतेने सुरक्षेच्या दृष्टीने काही नियम व अटीचे पालन करणे गरजेचे असल्याने जनतेने खालील प्रमाणे नियम अटी पाळाव्यात.

१. मा.पंतप्रधान यांची सभा सुरू होण्याअगोदर सर्व जनतेने सभास्थळी ०४.४५ वाजता, मिनिटाच्या अगोदर हजर होतील तसेच वृध्द पुरूष व महीला यांनी नमुद वेळेच्या व गर्दी होण्या अगोदरच सभास्थळी हजर व्हावे.

२. सभेसाठी येणारे सर्व जनतेने जेवन करूनच सभास्थळी यावे सदर सभास्थळी पाणी पिण्याची सोय केलेली आहे.

३. सभेसाठी येणारे सर्व जनतेने आपल्या सोबत कोणतेही बॅग व इतर वस्तू ज्यामध्ये पाणी बॉटल, टिफीन डबा सोबत आणु नये तसेच सिगारेट, लॉयटर, दारू बॉटल, इलेक्ट्रॉनिक गाडीची चावी व इतर आक्षेपार्ह वस्तु सोबत आणु नये. यासारख्या बॅग व वस्तू सोबत असल्यास त्यांना सभास्थळी प्रवेश दिला जाणार नाही.

४. सभेसाठी येणा—या सर्व जनतेने असे कळविण्यात येते की आपल्या सोबत कुणीही काळे कापड व काळा झेंडा आणु नये तसेच परीधान देखील करून येवु नये असे आढळयास सदर इसमाला सभास्थळी प्रवेश दिला जाणार नाही.

५. सभास्थळ ठिकाण GROW MORE VENTURES मैदान कन्हान नागपुर याच्या आजु बाजुच्या १ कीलोमिटर अंतराचे आतमध्ये राहणा—या सर्व रहवाश्यांनी आपल्या घरी दिनांक ०८/०४/२०२४ ते दिनांक १०/०४/२०२४ रोजीच्या कालावधीत कोणताही नातेवाईक, मित्र, कीवां इतर इसम पाहुणा म्हणुन आल्यास त्या बाबत पोलीस स्टेशन कन्हान येथील पोलीस निरिक्षक श्री. उमेश पाटील मो.क्र ९८२२५११७५१ यांना त्वरीत फोनव्दारे माहीती देतील यामध्ये कुणीही हयगय करणार नाही.

६. सभास्थळ ठिकाण GROW MORE VENTURES मैदान कन्हान नागपुर येथे येण्याकरीता बस कीवां इतर मोठया वाहनाचा वापर करू नये तसेच जवळील परीसरात राहणा—या नागरीकांनी कोणत्याही वाहनांचा वापर न करता पायी सभास्थळी यावे.

तरी वरीलप्रमाणे नियम व अटी सर्व नागरीकांनी पाळणे बंधनकारक आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर